महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९४ वे | दिनांक : ०८/०७/२०२६ | वार : बुधवार

# जात पडताळणीसाठी ५० लाखांचा 'रेट'? विधान परिषदेत खळबळ



**मुंबई** : मुंबईत नगरसेवक होण्यासाठी आणि जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मोठे आर्थिक व्यवहार होत असल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आमदार अनिल परब यांनी विधान परिषदेत केला. जात पडताळणी समितीत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी तब्बल 50 लाख रुपयांचा 'रेट' असल्याचा दावा करत त्यांनी सभागृहात खळबळ उडवून दिली. विशेष म्हणजे, भाजप आमदार प्रसाद लाड यांनीही अशा प्रकारचे प्रकार घडत असल्याचे सांगत काही प्रमाणात या आरोपांना दुजोरा दिला.

महाराष्ट्र नगरपालिका कायद्यातील दुरुस्ती विधेयकावर बोलताना अनिल परब यांनी जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले की, हा कायदा अनेक वेळा बदलण्यात आला. सुरुवातीला उमेदवारी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र देणे बंधनकारक होते. त्यानंतर तीन महिने, चार महिने, सहा महिने आणि आता एक वर्षाची मुदत देण्यात आली आहे. मात्र, मूळ समस्या कायम आहे.

अनिल परब यांच्या मते, जात पडताळणीची प्रक्रिया वर्षभर सुरू राहायला हवी. उमेदवाराने निवडणूक लढवली कीच अर्ज स्वीकारण्याची पद्धत चुकीची असून शिक्षण, नोकरी आणि इतर कारणांसाठीही ही प्रक्रिया सातत्याने सुरू असावी.

अनिल परब यांनी आरोप केला की, अधिकारी अनेकदा अर्जदारांना शेवटच्या दिवसापर्यंत थांबवतात. अंतिम मुदतीच्या दिवशी रात्री उशिरापर्यंत प्रमाणपत्रे दिली जातात. या सर्व प्रकारांचे पुरावेही आपल्याकडे असल्याचा दावा त्यांनी केला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, जात पडताळणी समितीत तीन प्रकारचे अहवाल तयार केले जातात. एका अहवालात प्रमाणपत्र वैध ठरवले जाते, दुसऱ्यात अवैध ठरवले जाते, तर तिसऱ्यात अधिक तपास आवश्यक असल्याचे नमूद केले जाते.

अनिल परब यांनी सर्वाधिक खळबळजनक आरोप करत म्हटले की, मुंबईतील जात पडताळणी समितीत प्रमाणपत्रासाठी सध्या ५० लाख रुपयांचा रेट सुरू आहे. त्यांनी सांगितले की, "असा सांगितले जाते की या व्यवहारात मंत्र्यांचाही समावेश असतो. त्यातील नेमका वाटा किती, हे मला माहिती नाही. मात्र अंतिम तारीख जसजशी जवळ येते तसतसा हा रेट शेअर बाजारासारखा वाढत जातो."

अनिल परब यांनी मुंबई महापालिकेतील निवडणूक प्रक्रियेचाही उल्लेख केला. एखादा विजयी उमेदवार जात वैधता प्रमाणपत्राच्या कारणावरून अपात्र ठरल्यास दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराला संधी मिळते. त्यामुळे निवडणूक न जिंकताही जात पडताळणी समिती 'मॅनेज' करून नगरसेवक होण्याचा खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

समितीच्या अध्यक्षांकडे मोठे अधिकार असल्यामुळे इतर अधिकाऱ्यांचे मत बाजूला ठेवून निर्णय दिले जातात. त्यामुळे दबाव आणि मनमानी वाढत असल्याचेही अनिल परब यांनी सभागृहात सांगितले.

मुंबईत मोठ्या प्रमाणात रॅकेट कार्यरत असल्याचा दावा करत अनिल परब म्हणाले की, "सरळ सांगितले जाते की पैसे दिल्याशिवाय जात वैधता प्रमाणपत्र मिळणार नाही. सरकारने दिलेल्या सहा महिन्यांच्या मुदतीत प्रलंबित अर्जांचा निपटारा करावा आणि शेवटच्या दिवसापर्यंत प्रमाणपत्रे अडकवून ठेवण्याची पद्धत बंद करावी," अशी मागणी त्यांनी केली.

अनिल परब यांच्या आरोपांनंतर भाजप आमदार प्रसाद लाड यांनीही सभागृहात बोलताना काही प्रमाणात या तक्रारी योग्य असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्यभर फिरताना अनेक विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी दोन लाख रुपयांची मागणी होत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. गरीब विद्यार्थी एवढे पैसे कुठून आणणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

या चर्चेला उत्तर देताना संबंधित मंत्र्यांनी सांगितले की, जात वैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया वर्षभर सुरू असते. मात्र राज्यातील नगरपालिका निवडणुका एकत्र आल्याने मोठ्या प्रमाणात अर्ज एकाचवेळी आले आणि त्यामुळे अडचणी निर्माण झाल्या.

सरकारने सभागृहाला आश्वासन दिले की, देण्यात आलेल्या सहा महिन्यांच्या मुदतीत निवडणूक लढविण्यासाठी आवश्यक असलेली सर्व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याचा प्रयत्न केला जाईल.

दरम्यान, अनिल परब यांनी केलेले ५० लाखांच्या कथित रेटचे आरोप आणि त्यावर प्रसाद लाड यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया यामुळे जात पडताळणी समित्यांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणाची चौकशी होणार का, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीवर गोळीबार; आरोपी पती फरार





**नांदेड** : तू काकाला का बोलली म्हणून पत्नीला जाब विचारत तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने गावठी कट्ट्यातून गोळ्या झाडल्या. यात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पत्नीला रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. लोहा शहरातील शिक्षक कॉलनी येथे सोमवारी मध्यरात्री हा गोळीबाराचा थरार घडला. पत्नीला गोळ्या घातल्यानंतर आरोपीने सासऱ्याला फोन करून ' तुझ्या पोरीला गोळ्या घातल्यात आता तुझ्याकडे येतो.' अशी धमकी देऊन तो फरार झाला.

लोहा शहरातील शिक्षक कॉलनी परिसरातील रहिवाशी विशाल जाधव आणि त्याची पत्नी अर्चना जाधव यांच्यात सोमवारी मध्यरात्री वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्यानंतर विशालने पत्नीला आधीला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. संतापाच्या भरात त्याने आपल्या कमरेला ठेवलेले गावठी कट्टा काढून तिच्यावर गोळीबार केला. यावेळी त्याने पत्नीवर सलग तीन गोळ्या झाडल्या. त्यापैकी एक गोळी कानाला चाटून गेली, तर दुसरी गोळी पाठीत लागल्याने अर्चना गंभीर जखमी झाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अर्चनाला तिच्या सासऱ्याने आणि तेथे जमलेल्या नागरिकांनी तातडीने उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक डॉ. नीलम रोहन यांच्यासह स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. फॉरेन्सिक व फिंगरप्रिंट पथकाने घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले आहेत.

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपी विशाल जाधव याच्याविरुद्ध मे 2023 मध्ये पेट्रोल पंप लुटीचा गुन्हा दाखल दाखल असून तो नुकताच जामीनावर सुटला होता. दरम्यान आरोपी विशाल जाधव व नांदेड येथे खाजगी वाहन चालवतो यादरम्यान तो अनेक गुन्ह्यांमध्ये सहभागी झाला होता, अशी माहिती पोलिसांनी सांगितली आहे. आरोपीच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकासह लोहा पोलिसांनी अनेक टीम वेगवेगळ्या दिशेने रवाना केले आहेत.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरात मंगळवारी सकाळी एक दुर्दैवी घटना उघडकीस आली. सोशल वर्क विषयात पीएचडीचे संशोधन करणारे विद्यार्थी राहुल सोनाळे यांनी विद्यापीठाच्या भाषा संकुल परिसरातील एका झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ५ वाजण्याच्या दरम्यान गस्तीवर असलेल्या सुरक्षा रक्षकाला ही घटना निदर्शनास आली. त्यानंतर तातडीने विद्यापीठ प्रशासन आणि पोलिसांना माहिती देण्यात आली. राहुल सोनाळे हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सोशल वर्क विषयात पीएचडीचे संशोधक विद्यार्थी होते. त्यांच्या निधनामुळे विद्यापीठ परिसरात शोककळा पसरली असून विद्यार्थी, प्राध्यापक आणि सहकाऱ्यांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. तपास पूर्ण झाल्यानंतरच घटनेमागील कारण स्पष्ट होणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ जुलै २०२६


## "नाती"

नाती जपली जीवापाड,
माणसे मात्र तोलत राहिली,
माझ्या कष्टांच्या प्रत्येक थेंबाला,
स्वार्थाची किंमत लावत राहिली.

मी दिले ते कर्तव्य समजून,
त्यांनी घेतले हक्क मानून,
जेव्हा अपेक्षांचा डोंगर वाढला,
तेव्हाच उभा राहिलो स्वतःला जाणून.

आता नाही तक्रार कुणाची,
नाही कुणाविषयी खंत,
स्वार्थी चेहऱ्यांच्या गर्दीतही,
जपेन मी स्वाभिमान अनंत.

पैशांनी जोडलेली माणसे ,
मनांना जोडू शकत नाहीत,
कर्तृत्व, प्रामाणिकपणा आणि माणुसकी,
यांच्याशिवाय नाती टिकत नाहीत,

माझ्या घामाच्या थेंबांना,
हिशोबाचे मोल मिळाले;
मन शोधत राहिले प्रेम
मला स्वार्थाचे चेहरे दिसले.

पैसे पाहून नाती जोडणारे,
काळ आल्यावर दूर जातात;
कर्तृत्व आणि स्वाभिमान असलेले,
एकटे असले तरी उंच उभे राहतात.

माझ्या खिशात काय आहे,
हे जगाला जाणून घ्यायचे असते;
पण माझ्या मनात काय चालले आहे,
हे विचारायला कुणाला वेळ नसतो.

गरज असेपर्यंत आपलेपणा,
गरज संपली की परकेपणा;
काही नाती रक्ताने जोडली जातात,
तर काही फक्त स्वार्थाने बांधली जातात.

मी बदललो नाही कधी,
फक्त माणसे ओळखायला शिकलो;
स्वार्थाच्या गर्दीत उभा राहून,
स्वाभिमानाने जगायला शिकलो.



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## "माझ्या गावची बोली" उपक्रमातून महाराष्ट्रातील बोलीभाषा होणार डिजिटल स्वरूपात जतन

**कन्नड** : त्रैमासिक तिफण आणि तिफण बोलीभाषा व लिपी संशोधन प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आता "तिफण डिजिटल" या नव्या व्यासपीठाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांचे जतन आणि संवर्धन केले जाणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून "माझ्या गावची बोली" हा विशेष उपक्रम राबविला जाणार आहे. यामध्ये राज्यातील प्रत्येक प्रदेशातील बोलीभाषेतील संवाद, उखाणे, म्हणी, जात्यावरच्या ओव्या, लोकगीते आणि लोककथा यांचे संकलन करून त्यांचे डिजिटल प्रकाशन केले जाईल.असा घेता येईल सहभाग :या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आपल्या भागातील बोलीभाषेतील साहित्याचे 5 ते 10 मिनिटांचे व्हिडिओ चित्रिकरण करावे. हे व्हिडिओ ९४०४०००३९८ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावेत. सोबत गावाचे नाव, पाठवणाऱ्याचे नाव आणि निवेदकाचे नाव पाठविणे बंधनकारक आहे.पाठविलेल्या व्हिडिओंमधून निवडक व्हिडिओ "माझ्या गावची बोली" या सदराअंतर्गत तिफणच्या डिजिटल माध्यमांवर प्रसारित केले जातील.बोलीभाषा वाचविण्याचा प्रयत्न :या उपक्रमाबत माहिती देताना तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे म्हणाले, "बोलीभाषा ही आपली खरी ओळख आहे. ती लुप्त होण्याआधी डिजिटल माध्यमातून ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणं तिचे जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे. त्यासाठीच आपली बोली आपणच वाचवू या ! हा उपक्रम हाती घेतला आहे. सर्वांनी यात सहभागी व्हावे."

## खासदार डॉ. रामराव वडकुते यांच्या हस्ते नांदेड-कुर्ला एक्सप्रेसला हिरवा झेंडा




**हिंगोली (गोपाल सातपुते)** : नांदेड-कुर्ला या नव्या रेल्वे गाडीचे हिंगोली रेल्वे स्थानकावर प्रथमच आगमन झाले असता, हिंगोलीकरांनी अत्यंत जल्लोषात आणि ऐतिहासिक असे स्वागत केले. भाजपा नेते खासदार डॉ. रामराव वडकुते यांच्या प्रमुख उपस्थितीत ढोल-ताशांचा गजरात, फटाक्यांची आतिषबाजी करत या रेल्वेचे स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार डॉ.वडकुते यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून पुढील प्रवासासाठी रवाना केले.या नव्या रेल्वे सुविधेमुळे हिंगोली जिल्ह्यातील नागरिक, उच्च शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी आणि व्यापारी वर्गाला थेट मुंबई (कुर्ला) गाठण्यासाठी एक हक्काचा व सोयीचा मार्ग उपलब्ध झाला आहे. या प्रसंगी बोलताना खासदार डॉ. रामराव वडकुते यांनी, हिंगोलीकरांची ही महत्त्वाची मागणी मान्य केल्याबद्दल देशाचे रेल्वेमंत्री आणि रेल्वे प्रशासनाचे मनापासून आभार मानले. ही नवी रेल्वे सेवा केवळ प्रवासाची सोय नसून, यामुळे हिंगोली जिल्ह्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा उद्योग आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष संजय कावडे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, शशिकांत वडकुते, शिवशंकर घुगेभाजपा जिल्हा महामंत्री हिंगोली सुनिताताई मुळे, गोपाल सातपुते जिल्हा प्रवक्ता विलास गोरे रजनीश पुरोहीत, बाबाराव घुगे, निखील बांगर, ,कृष्णा रुहटिया, रजनी पाटील, माणीक लोडे,कैलाश शहाणे, बंडु करहाळे, गुड्डू देवकते आदींची उपस्थिती होती. तसेच रेल्वे समितीचे राकेश भट्ट गोवर्धन अण्णा वीरकुंवर, नंदकिशोर तोष्णीवाल, खलील बेलदार, जेठानंद नेनवाणी, गणेश भैय्या साहु, शेख नौमान यांच्यासह रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्ह्यातील रेल्वे समितीचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, रेल्वे प्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रा. योगेश लहामटे यांची वस्तीगृह प्रमुखपदी नियुक्ती



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे. ई. एस महाविद्यालय जालना च्या वस्तीगृह प्रमुख पदी प्रा. योगेश लहामटे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्याबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री व उपप्राचार्य डॉ. उमेश मोगले, उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड, प्रा. यशवंत सोनूने,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ राजेंद्र सोनवणे, डॉ राजेश सरकटे, प्रा. सुनील इंदुरकर आदींनी अभिनंदन केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ जुलै २०२६


## संस्कृत समूहगीत स्पर्धेत डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय प्रथम




**छत्रपती संभाजीनगर** : संस्कृत भारती, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने दि. ४ जुलै २०२६ रोजी एम आय टी महाविद्यालय येथे आयोजित संस्कृत समूह गीत गायन स्पर्धे च्या महाविद्यालयीन विभागात डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय, समर्थ नगर यांनी प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेत महाविद्याल-याच्या विद्यार्थिनीं नी "जयदिह महाराष्ट्रराज्यम्" हे संस्कृत समूहगीत प्रभावीपणे सादर करून परीक्षकांसह उपस्थित रसिकांची मने जिंकली. विजेत्या समूहात कु. भार्गवी नरेंद्र मोदी, कु. राधिका अभय दैठणकर, कु. अमृता विलास गायके, कु. पुनम जनार्दन गुट्टे आणि कु. स्नेहल राजेश दिवाकर यांचा सहभाग होता. या विद्यार्थिनींना संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. मीनल श्रीगिरीवार, प्रा. माधुरी सुरेश रंगदाळ आणि प्रा. डॉ. प्रतिभा धोंडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच संवादिनीवर प्रा. डॉ. दिलीप दोडके, तर तबल्यावर श्री. चिन्मय पाठक यांनी उत्कृष्ट साथसंगत करून सादरीकरणाची रंगत वाढविली. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थिनींनी विजेत्या संघाचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्कृत समूहगीत या अभिनव संकल्पनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उद्योजिका डॉ. ज्योती दाशरथी आणि संस्कृत भारतीचे अध्यक्ष श्री. विवेक हंबर्डे यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारामुळे छत्रपती संभाजी नगरमध्ये संस्कृत समूहगीत स्पर्धेसारखा सांस्कृतिक व भाषिक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

## आम्रपाली प्रकाश त्रिभुवन यांना पीएच.डी.



**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान या विषयात "डिजिटल हेरिटेज ऑफ अजिंठा केव्ह्ज युजिंग कल्चरल कॉम्प्युटिंग" या विषयावरील संशोधनासाठी आम्रपाली प्रकाश त्रिभुवन यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांनी हे संशोधन डॉ. अजीज बिननासेर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. त्यांच्या संशोधनामध्ये अजिंठा लेण्यांच्या डिजिटल वारशाचे जतन, आभासी वास्तव (व्हर्च्युअल रिॲलिटी), कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) आणि सांस्कृतिक संगणनाच्या माध्यमातून सांस्कृतिक वारशाचे संवर्धन व पर्यटन विकासासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्यांच्या संशोधनावर आधारित पेटंट प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक संशोधन निबंध तसेच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. एडी सायंटिफिक इंडेक्सच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या क्रमवारीनुसार डिजिटल वारसा संशोधन क्षेत्रात आम्रपाली प्रकाश त्रिभुवन या भारतात प्रथम क्रमांकावर आहेत. तसेच जागतिक अव्वल शास्त्रज्ञांच्या यादीतही त्यांचा समावेश आहे.आम्रपाली प्रकाश त्रिभुवन यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल प्रकाश त्रिभुवन, किशोर जोहरे, प्रकाश गडवे व डॉ. टी. आर. पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व संशोधन कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

## ४८ विद्यार्थ्यांमागे एकच शिक्षक; BDO यांना निवेदन

**सिल्लोड** : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा-वांगी खुर्द (उर्दु) येथील विद्यार्थ्यांचा 'शिक्षणाचा हक्क' धोक्यात आला आहे.४८ विद्यार्थी संख्या असलेल्या या शाळेत ४ पदे मंजूर असताना केवळ २ शिक्षक कार्यरत होते.त्यात भर म्हणजे,२ जुलैपासून एक महिला शिक्षक ६ महिन्यांच्या प्रसूती रजेवर गेल्याने आता संपूर्ण शाळेचा भार एकाच शिक्षकावर येऊन पडला आहे. एकाच शिक्षकाने सर्व वर्ग सांभाळणे अशक्य असल्याने विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत आहे.या गंभीर समस्येवर केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी आज सिल्लोडचे गटविकास अधिकारी (BDO) यांना तीव्र निषेधाचे निवेदन सादर केले. प्रशासनाने तात्काळ पर्यायी शिक्षकाची नियुक्ती न केल्यास,शाळा व्यवस्थापन समिती व संतप्त पालकांसह शाळेला कुलूप ठोकून पंचायत समितीसमोर शांततापूर्ण आंदोलन करण्याचा इशारा म्हस्के पाटील यांनी दिला आहे.यावेळी निवेदनासोबत शाळा व्यवस्थापन समिती,पालक व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यांचे पत्र जोडण्यात आले असून प्रशासनाने २४ तासांत निर्णय घ्यावा,अशी मागणी करण्यात आली आहे.

## साहित्य क्षेत्रात कन्नड तालुक्याचे मोठे योगदान - चंद्रकांतराव देशमुख



**कन्नड (डॉ. शिवाजी हुसे)** : कन्नड तालुक्याला फार मोठी साहित्यिक व सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. अनेक लेखक - कवींनी मराठी भाषा व साहित्य क्षेत्राला फार मोठे योगदान दिले आहे. असे प्रतिपादन श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव चंद्रकांतराव देशमुख यांनी केले. ( ता. ६ ) येथील शिवाजी महाविद्यालयात कन्नडचे युवाकवी ज्ञानेश्वर गायके यांच्या कवितेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यासक्रमात समावेश झाल्याबद्दल त्यांचा त्रैमासिक तिफण,मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्राच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते कार्यक्रमाचेअध्यक्ष म्हणून उपस्थित होते. मंचावर प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. अंबादास सगट, डॉ. प्रतिभा अहिरे, नायब तहसिलदार दिलिप कुमार सोनवणे, डॉ. शिवाजी हुसे, कवी ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, अरुण थोरात, सुरेश औटे, रामेश्वर मोरे, प्रविण दाभाडे, भगिरथ अंधानेरकर यांची उपस्थिती होती. या प्रसंगी प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आज साहित्य क्षेत्रात मोठे कार्य करीत आहे, याचा मला आनंद आहे. महाविद्यालयाने वाङ्‌मयीन चळवळी व उपक्रमांना पाठबळ दिले आहे. सातत्याने तिफणचे उपक्रम त्यातूनच अनेक कवी उदयास येवून उत्तमोत्तम लेखन करीत आहेत. डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. अंबादास सगट, दिलिपकुमार सोनवणे, डॉ. शिवाजी हुसे, रामेश्वर मोरे यांनीही या प्रसंगी मनोगत व्यक्त केले. सर्वांनीच कन्नडच्या साहित्य परंपरेचा गौरव करून ज्ञानेश्वर गायके यांचे कौतुक केले. ज्ञानेश्वर गायके यांनीही सत्काराला उत्तर देतांना महाविद्यालया विषयी कृतज्ञता व्यक्त केली.

या महाविद्यालयातच माझी वाङ्‌मयीन जडणघडण झाल्यामुळे माझी वाटचाल यशस्वी झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून डॉ. रामचंद्र झाडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ जुलै २०२६


## बुध्दिमान चिंपांझी

चिंपांझी जंगली प्राणी
मानवासारखा दिसतो
मौज मस्ती करतांना
आनंदाने हसतो

दाट व काळे केस
असतात त्याच्या अंगावर
बारीक फांद्या विणून
बनवितो आपले घर

पाय त्याचे आखूड
बळकट लांब हात
झाडावर चढून
बसतो पानं खात

खाणाखुणा करून
आपसात संवाद साधतो
बुध्दीचा वापर करून
माणसाप्रमाणे वागतो

वेगवेगळे आवाज काढून
माणसाची करतो नक्कल
संकटाची चाहूल लागता
वापरतो नामी शक्कल




**रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## बीज पेरणीचे यंत्र

सुताराची कलाकारी,
यंत्र तिफण तरते.
माय पेरता पेरता,
ओटी शेतीचे भरते.

मशागत झाल्यावर,
बाप ओलावा हेरतो.
हर्ष उल्हासाने बाप,
शेती शिवार पेरतो.

तीनफणी तिफणीने,
बिया खोलात टाकतो.
तिफणीच्या मागे मागे,
बाप बैलांना हाकतो.

तीन फणांची तिफण
बीज पेरणीचे यंत्र
बिया पाभरी पडता
समांतर भारी तंत्र.

तिफणीची करामत,
बीज समांतर पडे.
बीज अंकुराला येता,
शेती नवलच घडे.




**नागेश बोंतेवाड**
छत्रपती संभाजीनगर


# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात मुरूम येथे भव्य आरक्षण बचाव मोर्चा...




**मुरूम, ता. उमरगा येथील अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात आरक्षण बचाव मोर्चाच्या वतीने सपोनि विठ्ठल चासकर यांना निवेदन देताना मुकेश सोनकांबळे, भालचंद्र लोखंडे, धीरज बेळंबकर, उमेश सुरवसे, एस. के. चेले, दिलीप भालेराव, कैलास शिंदे, दिनेश भालेराव, हरीश डावरे, आनंद कांबळे व अन्य**

**मुरूम — (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून आरक्षण संपविण्याच्या प्रयत्नांविरोधात मुरूम शहरात आरक्षण बचाव मोर्चा शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विविध सामाजिक संघटना, संविधानप्रेमी नागरिक, युवक-युवती, महिला व भीमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.मोर्चाची सुरुवात मुरूम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहर वाचनालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. संविधान व सामाजिक न्यायाचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त करत घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला. हा मोर्चा मुरूम शहरातील प्रमुख मार्गावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मोर्चाचे जाहिर सभेत रूपांतर झाल्यानंतर मुकेश सोनकांबळे, भालचंद्र लोखंडे, धीरज बेळंबकर, उमेश सुरवसे, विश्वभूषण लिमये, गुरवे सर, एस. के. चेले, दिलीप भालेराव, कैलास शिंदे, दिनेश भालेराव, हरीश डावरे, आनंद कांबळे आदींनी संविधान, सामाजिक न्याय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि आरक्षणाचे महत्त्व या संबंधांनी मार्गदर्शन करताना आरक्षण हे वंचित समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीचे प्रभावी साधन असून अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण कोणत्याही परिस्थितीत मान्य होणार नाही, अशी ठाम भूमिका मांडली. जाहीर सभा संपल्यानंतर मोर्चाच्या वतीने मुरूम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल चासकर यांच्याकडे निवेदन देण्यात आले. या निवेदनात अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ रद्द करावे, आरक्षणाला कोणत्याही प्रकारे धक्का लागू देऊ नये आणि संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या अधिकाराचे संरक्षण करावे, अशी ठाम मागणी करण्यात आली. या मोर्चा करिता झुंबर बनसोडे, आनंद कांबळे, किरण गायकवाड, सुरज कांबळे, गौतम कांबळे, दिनेश भालेराव, प्रदीप गायकवाड, अभिजीत कांबळे, अजय गायकवाड, गोपी कांबळे, अमोल बनसोडे, जयपाल सुरवसे, राम सागर आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. मोर्चाच्या माध्यमातून संविधानाचे संरक्षण, सामाजिक न्यायाची जपणूक आणि अनुसूचित जातीच्या आरक्षणावरील उपवर्गीकरणाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. नियोजनबद्ध, जनसहभाग आणि मान्यवरांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे आरक्षण बचाव मोर्चा यशस्वी झाल्याचे दिसून आले.

# लेखक तिसरी-चौथीच्या प्रशिक्षणार्थी यांच्या भेटीला



**छत्रपती संभाजीनगर :** तालुका-जिल्हा संभाजीनगर येथील डेक्कन मिलीटरी स्कुलमध्ये तिसरी व चौथीच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणात प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण यांनी नकतेच प्राशिक्षणार्थीना " लेखक आपल्या भेटीला " या उपक्रमात मार्गदर्शन करतांना सांगितले की, " मुलांना नवीन अभ्यासक्रमातील पाठ आणि कवितांचा तिसरी- चौथीच्या विद्यार्थी यांना प्रभावीपणे अध्यापन करावे. त्यातून चांगले विद्यार्थी घडविले तरच ते विद्यार्थी विविध टायलंट परीक्षेत यशस्वी होतील, कारण चौथीच्या अभ्यासक्रमात कौतुकाची थाप, आणि.सत्कर्म हेच मायबाप आहे." लेखक अय्युब पठाण यांची चौथीच्या नवीन अभ्यासक्रमात " कौतुकाची थाप " या पाठाचा मराठी भाषाच्या अभ्यासक्रमात समावेश आहे. प्रारंभी तज्ञ प्रशिक्षक नितीन पवार यांनी लेखक अय्युब पठाण यांचा स्वागत व सत्कार केला. याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शाळेमधील तिसरी आणि चौथीला अध्यापन करणारे सर्व शिक्षक- शिक्षिका हे मोठया संख्येने उपस्थित होते.शेवटी कार्यक्रमाची सांगता अय्युब पठाण यांच्या " आई " या मधूर आणि ऱ्हदयस्पर्शी कविता गायनाने झाली.

# सत्याशोधक विद्यालयात गणित शब्द, पाढे उपक्रम



**सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी आणि पालक यांचा सत्कार करण्यात आला अनुष्का गजानन देखणे, गौरी गजानन मोहिते, मयुरी भाऊसाहेब घोडे सोबत शिक्षक वृंद**

मानव विकास व पुनर्निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगांव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे आज दिनांक ७ जुलै २०२६ रोजी गणित हा विषय पक्का होण्यासाठी आणि गणितीय शब्द लक्षात राहण्यासाठी रोज बाहेरील फलकावर ५ स्पेलिंग सहित शब्द आणि त्याचा अर्थ लिहिणे, आणि पाढे लिहणे हा उपक्रम सुरू करण्यात आला गणित शिक्षक निलेश कंकाळ यांनी हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनील वाकेकर साहेब आणि संस्थेच्या सचिव जयश्री बनकर मॅडम यांची संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल अशी आशा आहे. विद्यार्थ्यांना याचा नक्की लाभ होईल. पर्यवेक्षक लक्ष्मण पांढरे यांनी सांगितले की गणित विषयाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ जुलै २०२६


## ज्ञानेश्वर विद्यालयात गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप: 'टीम १९९७' चा स्तुत्य उपक्रम




**छत्रपती संभाजीनगर :** येथील ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे 'टीम १९९७' च्या वतीने गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोफत गणवेश आणि वर्षभर उपयुक्त पडणारे शैक्षणिक साहित्य (किट) वाटप करण्याचा स्तुत्य कार्यक्रम नुकताच पार पडला. हा कार्यक्रम विद्यालयाच्या कैलासवासी पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ सभागृहात आयोजित करण्यात आला होता.विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक संभाजी तांगडे हे होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ शिक्षक संतोष अधाने आणि 'टीम १९९७' चे प्रतिनिधी प्रकाश सावतेकर, सूरज इंगोले व किशोर बिरोटे उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना मिळाली मदत: कार्यक्रमात इयत्ता ८ वी ते १० वी मधील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना शैक्षणिक किट देण्यात आली. यामध्ये खालील विद्यार्थ्यांचा समावेश होता: इयत्ता ८ वी : स्वराली अवचार, गायत्री देवकर, दीक्षा चव्हाण. इयत्ता ९ वी : साईनाथ रणमाळे, वैष्णवी काबलीये, वनिता साळवे, आतिष दळवी. इयत्ता १० वी : ओम गायकवाड, ईशा बिरोटे. 'टीम १९९७' ने सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना दिलेले हे साहित्य त्यांच्या पुढील शिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, अशा भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या.

**सूत्रसंचालन व आभार :**

कार्यक्रमाचे अतिशय सुंदर व नेटके सूत्रसंचालन *मंगल सुलताने यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संतोष यादव यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. 'टीम १९९७' च्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.






## विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात 'बाप' कविता



**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 अंतर्गत बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या बी.ए. तृतीय वर्षाच्या मराठी अभ्यासक्रमात सुनील डोके यांच्या 'पोशिंदा' या काव्यसंग्रहातील 'बाप' या कवितेचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण जीवनाचे वास्तव, शेतकरी जगण्यातील संघर्ष आणि कष्टकरी बापाच्या वेदनांना शब्दबद्ध करणाऱ्या या कवितेच्या समावेशामुळे जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून कवी सुनील डोके यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.मूळचे जालना जिल्ह्यातील बोरगाव येथील रहिवासी असलेले कवी सुनील डोके हे ग्रामीण जीवनाशी घट्ट नाळ जोडलेले साहित्यिक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांनी आपल्या 'पोशिंदा' या काव्यसंग्रहातून शेतकऱ्यांच्या जीवनातील संघर्ष, दुष्काळाचे चटके, अवकाळी पावसाने केलेली हानी, शेतीमालाला न मिळणारा योग्य भाव, हमीभावाचा प्रश्न, कर्जबाजारीपणा आणि शेतकरी कुटुंबांच्या भावविश्वाचे अत्यंत वास्तववादी आणि हृदयस्पर्शी चित्रण केले आहे.'बाप' ही कविता एका कष्टकरी, त्यागी आणि संघर्षशील बापाच्या जीवनाचे प्रतिनिधित्व करते. कुटुंबाच्या सुखासाठी स्वतःच्या इच्छा-आकांक्षांना तिलांजली देणारा, संकटांशी दोन हात करत संसाराचा गाडा ओढणारा आणि आयुष्यभर कष्टाची पेरणी करणारा ग्रामीण बाप या कवितेतून साकार झाला आहे. त्यामुळे ही कविता केवळ एका व्यक्तीची कहाणी न राहता मराठवाड्यातील लाखो शेतकरी बापांच्या जगण्याचे प्रतीक बनली आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने या कवितेची केलेली निवड ही ग्रामीण साहित्याच्या सामर्थ्याची आणि शेतकरी जीवनाविषयीच्या संवेदनशीलतेची पावती मानली जात आहे. बोरगावच्या मातीतील एका साहित्यिकाच्या कवितेला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात स्थान मिळणे ही जालना जिल्ह्यासाठी, मराठवाड्यासाठी आणि संपूर्ण शेतकरी-कष्टकरी समाजासाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब ठरत आहे.कवी सुनील डोके यांच्या या यशामुळे मराठवाड्यातील ग्रामीण साहित्याला नवी ओळख मिळाली असून शेतकरी जीवनाचे वास्तव शब्दबद्ध करणाऱ्या साहित्यकृतींनाही शैक्षणिक स्तरावर योग्य सन्मान मिळू शकतो, हा विश्वास अधिक दृढ झाला आहे. साहित्य, शिक्षण, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी कवी सुनील डोके यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील साहित्यप्रवासासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.


